विद्युत कंपन्यामधील शासकीय गुंतवणूक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित मार्फत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.११५/ऊर्जा-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १५ नोव्हेंबर, २०१७

संदर्भ - शासन निर्णय,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक :-

१) निधीवि-२०१७/प्र.क्र.४४(१)/ऊर्जा३, दि.३१/३/२०१७
२) समायोजन-२०१५/प्र.क्र.४४(२) /ऊर्जा३, दि.३१/३/२०१७
३) समायोजन-२०१५/प्र.क्र.४४(३) /ऊर्जा३, दि.३१/३/२०१७
४) समायोजन-२०१५/प्र.क्र.४४(४) /ऊर्जा३, दि.३१/३/२०१७
५) समायोजन-२०१५/प्र.क्र.४४(५) /ऊर्जा३, दि.३१/३/२०१७
६) निधीवि-२०१६/प्र.क्र.१००/ऊर्जा३, दि.१३/०१/२०१७
७) निधीवि-२०१६/प्र.क्र.१००/ऊर्जा३, दि.३१/३/२०१७
८) महासूत्रधारी कंपनीचे पत्र क्र.एमएसईबीएचसीएल/सीएस/७२२, दि.०५/१०/२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुर्नरचनेनंतर (१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, (२) महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, (३) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित हया तीन कंपन्यांची पूर्ण मालकी शासनाकडे आहे. त्यानुसार वरील तीन विद्युत कंपन्यामधील शासकीय गुंतवणूक सूत्रधारी कंपनीमार्फत होणे आवश्यक होते. परंतु शासनाने सन २०१६-१७ या कालावधीत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वरील तीन विद्युत कंपन्यामध्ये थेट भांडवली गुंतवणूक दर्शविली आहे. त्यामुळे गुंतवणूकीच्या दर्शनी मूल्या इतके विद्युत कंपन्यांचे समभाग सूत्रधारी कंपनीच्या नावे वाटप करणे शक्य झालेले नाही. परिणामी हया विद्युत कंपन्या सदर रक्कम सध्या “Share Application money pendig allotment” म्हणून दाखवित आहेत. सदर रकमेचे समभाग सूत्रधारी कंपनीच्या नावे होण्यासाठी सदर गुंतवणूक सूत्रधारी कंपनी मार्फत होणे आवश्यक आहे. त्यासाठी सदर विद्युत कंपन्यामध्ये शासनाने भांडवली गुंतवणूक करण्यासाठी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांना शुध्दीपत्रक काढण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित हया कंपन्यामध्ये केलेली भांडवली गुंतवणूक ही महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मार्फत केलेली भांडवली गुंतवणूक समजण्यात यावी. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मर्यादित हया

कंपन्यांनी सदर रकमेच्या दर्शनी मूल्या इतके समभाग महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधारी कंपनी मर्यादित हया कपंनीच्या नांवे वितरीत करावेत.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१११५१५१९३४८११० असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Vilas Mahadeorao Rajurkar

Digitally signed by Vilas Mahadeorao Rajurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry, Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=83469494bac86099a320f3e14bf8421ee9d2b48e344470b76ea2595df04951b4, serialNumber=02c5c00269dd48836be0d9939bdff848a9ff1f1a9fd195baf3a104d09b0817d9, cn=Vilas Mahadeorao Rajurkar
Date: 2017.11.15 15:22:52 +05'30'

(वि.म.राजुरकर)
शासनाचे अवर सचिव

प्रत:-

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधारी कंपनी मर्यादित, हॉंगकॉंग बॅंक बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.
२) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
३) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
४) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, प्रकाशगड, वांद्रे, (पूर्व), मुंबई-५१
५) सचिव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, १३ वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई-०५
६) मा.विरोधी पक्षनेता विधान सभा / विधान परिषद, विधान भवन, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), /(लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-४०००२०.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
९) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१
१०) निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.
११) नियोजन विभाग (का-१४६१), मंत्रालय, मुंबई -३२.
१२) वित्त विभाग, (अर्थसंकल्प-१४ / साधनसंपत्ती / साऊ / व्यय-१६) मंत्रालय, मुंबई-३२.
१३) उद्योग,ऊर्जा व कामगार विभागातील सर्व कार्यासने
१४) निवडनस्ती (ऊर्जा-३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.